**<u>सं. फौ. ख. क्र. २६/२०२५</u>**
**<u>निशाणी क्र. १६</u>**

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. १:</u>**

कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव :– श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर
वय :– ५५ वर्षे,
धंदा :– हॉर्टीकल्चर मिस्तरी, पुणे मनपा.
राहणार :– बालेवाडी, ता. हवेली, जि. पुणे.

**<u>फिर्यादीतर्फे वकील श्री. शिवाजी पाटील यांच्यामार्फत सुरु</u> :–**

०१. दिनांक २८/१२/२०२४ रोजी मी ढोले पाटीलरोड क्षेत्रीय कार्यालय येथे हॉर्टीकल्चर मिस्तरी म्हणून कार्यरत होतो. दिनांक ०९/१२/२०२४ रोजी इकबाल कासम शेख यांनी विनापरवाना वृक्षतोडीबाबत अर्ज सादर केला होता. सदर पत्रावर इतर सहा लोकांनी सह्या केल्या होत्या. सदर पत्र मुळ स्वरूपाचे असल्यामुळे व त्यावर कार्यालयाचा आवक क्रमांक व शिक्का असल्यामुळे त्यास **निशाणी १७** देण्यात आली. मी त्याअनुषंगाने दिनांक २८/१२/२०२४ रोजी घटना ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, त्याठिकाणी बुच प्रकाराची सहा झाडे विनापरवाना तोडण्यात आलेली होती. सदर ठिकाणी मी अनाधिकृत वृक्षतोडीबाबत पंचनामा तयार केला. त्यावेळी तेथे एजाज हमीद शेख व इकबाल मोहम्मद कासम हे हजर होते त्यांनी पंचनाम्यावर पंच म्हणून सही केली आहे. सदर पंचनाम्यास **निशाणी १८** देण्यात आली. घटना ठिकाणी मी फोटो घेतले होते. सदर फोटोला एकत्रीत अर्टिकल अ देण्यात आले. सदर घटनेबाबत मी अहवाल तयार केला. आता मला तो अहवाल दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. अहवालास **निशाणी १९** देण्यात आली. सदरचे फोटो मी महाजन स्टुडीओ मधून डेव्हलप करून घेतले होते. त्याबाबतचे भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब प्रमाणे मी प्रमाणपत्र सादर करू शकतो. कार्यालयामार्फत आरोपी यांना दिनांक ०६/०१/२०२५, १३/०२/२०२५ व दिनांक ११/०३/२०२५ रोजी नोटीस पाठविण्यात आल्या. सदर नोटीसच्या स्थळप्रती मी प्रस्तूत फिर्यादसोबत दाखल केलेल्या आहेत. सदर नोटीसच्या स्थळप्रती असल्याने त्यास अनुक्रमे **निशाणी २० ते निशाणी २२** देण्यात आले. सदर आरोपी यांनी दिनांक २०/१२/२०२४, २३/१२/२०२४, १६/०१/२०२५, ०३/०३/२०२५ व २४/०२/२०२५ रोजी खुलाशे सादर केले होते. सदर खुलाशांना एकत्रीत **निशाणी २३** देण्यात आली. सदर खुलासे समाधानकारक नसल्याने आरोपीविरूद्ध मी फिर्याद दाखल केली. मला फिर्याद दाखल करण्याबाबत अधिकार देण्यात आलेले आहेत. आज

आरोपी मा. न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण...**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. एस. पोटे यांच्यामार्फत सुरु :-**

०२. दिनांक २८/१२/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाल्याबाबतचा उल्लेख मी फिर्यादमध्ये नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३०/०७/२०२४ रोजी आरोपी क्र. १ यांनी वृक्षतोडीसाठी परवानगी मिळणेसाठी अर्ज पुणे महानगरपालिकेकडे केला होता. दिनांक २७/०८/२०२४ रोजी पुणे मनपा यांनी आरोपी क्र. १ यांना झाडे छाटनीसाठी परवानगी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार व पंच ही एकच व्यक्ती आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, दिनांक ०९/१२/२०२४ रोजीच्या तक्रारी अर्जामध्ये आरोपी यांना वृक्षांची उंची कमी करण्याकरिता परवानगी देण्यात आली होती हे नमूद करण्यात आलेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपी यांनी तक्रारी अर्जाला देखील दिनांक १८/१२/२०२४ व २०/१२/२०२४ रोजी खुलासा सादर केलेला होता. दिनांक ०६/०१/२०२५ च्या नोटीसला दिनांक १६/०१/२०२५ रोजी आरोपी यांनी खुलासा सादर केलेला होता हे म्हणणे बरोबर आहे. तसेच १३/०२/२०२५ च्या नोटीसला आरोपी यांनी दिनांक २४/०२/२०२५ रोजी खुलासा सादर केलेला होता हे देखील बरोबर आहे.हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी खुलासा सादर केलेला असताना देखील मुळ तक्रारदार यांच्यासांगण्यावरून मी आरोपीविरूद्ध खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः आरोपींना पाहिलेले नाही तसेच घटनास्थळावरून झाड तोडीबाबत कोणतेही हत्यार, लाकुडफाटा जप्त केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व मुळ तक्रारदार यांच्यामध्ये ट्रस्ट संदर्भात वाद असल्यामुळे मुळ तक्रारदार यांच्या सांगण्यावरून मी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | समक्ष, | श्रवणोत्तर स्वीकृत, |
|---|---|---|
| | **सही/-** | **सही/-** |
| ठिकाणः पुणे | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** |
| दिनांकः १९/११/२०२५. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| | (मनपा न्यायालय), जि. पुणे. | (मनपा न्यायालय), जि. पुणे. |